॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३ (प्रतिनिधी) : जागतिक सायकल दिना निमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सोमवार दि. ३ जून रोजी सामाजिक संदेश देणाऱ्या सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

संयुक्त राष्ट्र समितीने ३ जून हा जागतिक सायकल दिन घोषित केला आहे. आरोग्याच्या दृष्टीने व प्रदुषण कमी होण्याच्या दृष्टीने ही घोषणा करण्यात आली आहे. विद्यापीठात सोमवारी मुख्य प्रवेशद्वारापासून प्रशासकीय इमारतीपर्यंत सायकल रॅली काढण्यात आली. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी व संभाजीनगरच्या एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. विलास सपकाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत हिरवा झेंडा दाखवून सायकल रॅलीला प्रारंभ झाला. यावेळी रा.से.यो. संचालक डॉ. सचीन नांद्रे उपस्थित होते. या रॅलीत प्रा. किशोर पवार , प्रा. दिपक दलाल, प्रा.मनोज पाटील, प्रा.प्रतिभा गलवाडे, चंद्रकांत महाजन, तेजस वाणी, आदर्श पाटील, इरफान पिंजारी, महेश वाणी, राजू मराठे, सुभाष पवार, राम घोरपडे, समीर रोकडे यांनी सहभाग घेतला. रा.से.यो. समन्वयक डॉ. दिनेश पाटील, डॉ. मनोज इंगोले, अरूण सपकाळे, शिवाजी पाटील, कैलास औटी, आकाश भामरे, विजय बिऱ्हाडे, वैभव बाविस्कर, दर्शन नेवे, संकेत चौधरी, वैशाली कोळी आदी उपस्थित होते.

**बातमी नं. २**

जळगाव ३ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या वतीने घेण्यात आलेल्या परिसर मुलाखतीमध्ये रासायनिक तंत्रज्ञान संस्थेच्या सहा विद्यार्थ्यांना मुंबई येथील कुमार मेटल इंडस्ट्रीज प्रा. लि. या कंपनीत निवड झाली आहे.

या परिसर मुलाखतीसाठी विद्यापीठात प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या त्यात विद्यापीठाच्या रासायनिक तंत्रज्ञान संस्थेतील बी.टेक. ऑईल टेक व केमिकल इंजि.चे विद्यार्थी सहभागी झाले होते. कंपनीचे अधिकारी राजेंद्र चांदे, सदानंदन नायर, विकास पटेल, प्रशांत मोराणकर यांनी मुलाखती घेतल्या. यामध्ये गायत्री पाटील, श्वेता गोडेकर, समाधान पाटील, चिराग चोपडे, कृष्णा बोरसे आणि अन्सारी मोहंमद शोएब या सहा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. रमेश सरदार, उपसमन्वयक डॉ. उज्वल पाटील, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी मुलाखतीचे व्यवस्थापन केले. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, रासायनिक तंत्रज्ञान संस्थेचे संचालक डॉ.ए.के. गोस्वामी, प्रा.सिरसम यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ३ जून, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी